रयत शिक्षण संस्थेचे,

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा. जि. पालघर.

## इतिहास विभाग आयोजित Online Webinar

दिनांक – २५/०९/२०२०.

### विषय – Nature of online Examination

कोव्हीड – १९ च्या संसर्गामुळे महाराष्ट्र सरकारचा आदेश व मुंबई विद्यापीठ, मुंबई च्या परिपत्रकानुसार मुंबई विद्यापीठा अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांनी अभ्यासक्रम online पद्धतीने पूर्ण करावा. परीक्षा online पद्धतीने घ्यावेत अशा सूचना आहेत. त्यानुसार महाविद्यालय online पद्धतीने सुरु ठेवून अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला. २०२०–२१ या शैक्षणिक वर्षाच्या परीक्षा online घ्याव्यात असे विद्यापीठ परिपत्रक आले. त्यानुसार online परीक्षेचे स्वरूप कसे असावे यासंबंधी विद्यापीठाने मार्गदर्शक सूचना केल्या होत्या. त्यासाठी इतिहास विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना online परीक्षेविषयी माहिती देण्यासाठी **शुक्रवार दिनांक – २५/०९/२०२० रोजी सकाळी ११:०० वाजता online webinar** आयोजित केले होते. त्यामध्ये डॉ. व्ही. बी. गाडे व डॉ. एस. एच. जाधव यांनी मार्गदर्शन केले. या परिक्षेसाठी इंटरनेटच्या सुविधेसह मोबईल किंवा laptop असण आवश्यक आहे. विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार परीक्षा घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका ही वस्तुनिष्ठ स्वरुपाची आहे. परीक्षेत एकूण ५० बहुपर्यायी प्रश्न आहेत. त्या प्रश्नाच्या खाली चार पर्याय दिलेले असतील. त्यापैकी एका पर्यायावर क्लिक करून पुढचा प्रश्न सोडवावा. प्रश्न पत्रिकेतील सर्व प्रश्न सोडवून झाल्यानंतर शेवटी सबमिट बटन येईल. त्यावर क्लिक करून पेपर जमा करावा. शेवटी Your Response has been Recorded असा संदेश आल्याची खात्री करून घ्यावी. या परीक्षेसाठी शिक्षकांना विद्यार्थ्यांकडून Google Form द्वारे Mock Test घेण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

या वेबिनारचे अध्यक्ष व मार्गदर्शक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव हे होते. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारची भीती मनामध्ये न बाळगता परीक्षेला सामोरे जावे. आता आपल्याला तंत्रज्ञानाचा वापर करून घेता येणार आहे. काही अडचणी आल्यास Helpline नंबरवर संपर्क करा. असे मार्गदर्शन करून परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या वेबिनारमध्ये ५० विद्यार्थी व ८ शिक्षकांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. एच. जाधव यांनी केले. तर आभार प्रा. डी. आर. भोये यांनी मानले.

Head
Department of History
Arts, Sci. & Com. College
Moknada, Dist. Thane

Arts, Science & Com. College
Mokhada

Principal
Arts, Science & Com. College
Mokhada, Dist. Palghar